# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१६/११/१७
## दि.१५/११/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ६४२/१७,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | शिवाजी घोडके,वय-२० वर्षे,रा.गणेशनगर थेरगाव,पुणे |
| **आरोपी** | दिपक विष्णु गुजर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/११/२०१७ रोजी १५/३० वा.चंद्र सावित्री पार्क,एफ/७,गणेशनगर थेरगाव,पुणे येथील पार्कींग मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची आजी श्रीमती.जामनाबाई बारीकराव घोडके,वय-८० वर्षे,रा.चंद्र सावित्री पार्क,एफ/७,गणेशनगर,थेरगाव,पुणे ही तीचे राहते घराचे पार्कींग मध्ये बसली असताना,नमुद ठिकाणी यातील नमुद इसम दिपक विष्णु गुजर याने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने अविचाराने व निष्काळजीपणे पाठीमागे घेत असताना श्रीमती.जामनाबाई हिचे अंगावर घालुन,तीस गंभीर जखमी करुन,तीचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.एल.जाधव ८३८००७३५८३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ४६२/१७,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | पो.हवा. जाधव, कोंढवा पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | स्कुल बसवरील अज्ञात चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/११/१७ रोजी १५/३० वा. ग्राफीक रिअल इस्टेट समोर कोंढवा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील स्कुल बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार संदिप दिलीप पानसरे,वय-३०,रा.ओम शांतीनगर,जि.अहमदनगर यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. देशमुख |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५३५/१७,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | पो.हवा. मोढवे, भारती विद्यापीठ पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/११/१७ रोजी १३/१५ वा. स्वामी आनंद कन्स्ट्रक्शन सिध्दीविनायक सोसायटी आंबेगांव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी त्यांचे स्वामी आनंद कन्स्ट्रक्शन सिध्दीविनायक सोसायटी आंबेगांव, पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,महिला व इसम मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील मजुर महिला सत्यअम्मा मसय्या कर्णे,वय-६० वर्षे हि बांधकाम साईटवर पाचव्या मजल्यावर पाणी मारण्याचे काम करीत असताना,तीचा तोल जावुन ती वरून खाली पडुन मयत झाली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ताटे ९९२२४४८१०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १८८/१७,भादविक ३९५ |
| **फिर्यादी** | विकी रवाणी,वय- २२ वर्षे,रा.ढोले पाटील रोड,पुणे |

**आरोपी** निलेश घायवळ व त्याचे १५ ते २० साथीदार

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१२/११/२०१७ रोजी २४/०० वा. हॉटेल इथोनिशिया,एम.क्युब,ढोले-पाटील रोड,मन्सुर अली टॉवर,चौथा मजला,पुणे

**तपशिल** यातील नमुद इसम निलेश घायवळ व त्याचे १५ ते २० साथीदार यांनी तीन कार व एक मोपेड या गाडीमधुन इथोनेशिया हॉटेल मध्ये जावुन,निलेश भाईने भेजा है विवेक यादव कीधर है। असे म्हणाले असता,फिर्यादी यांनी त्यास मुझे पता नही असे सांगितल्याचे कारणावरून सदर इसमांनी फिर्यादी यांचे तोंडावर,नाकावर व डोळ्या जवळ मारहाण करुन त्यांना जखमी करुन,फिर्यादी यांचे हॉटेल मधील गल्यात हात घालुन जबरदस्तीने गल्ल्यातील १३,७००/- रुपये काढुन घेवुन दहशत निर्माण केली आहे.

**त.अंमलदार** वरिष्ठ पो.निरी.रघुनाथ जाधव, खंडणी विरोधी पथक,गुन्हे शाखा,पुणे ९८२२५५५५५४

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** निगडी पो स्टे ६३६/१७,भादविक ३९२,३४

**फिर्यादी** विनोद कावळे,वय-३२,रा.

**आरोपी** मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१३/११/१७ रोजी २१/४५ वा. यमुनानगर सेक्ट नं.२१,निगडी,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घराचे बाहेर मोबाइलवर बोलत उभे असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील ८,०००/- रु किचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावुन चोरुन नेला आहे. (फिर्यादी हे त्यांचे वर्कशॉपच्या महत्वाच्या कामा निमीत्त बाहेर गांवी गेले असल्याकारणाने त्यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.)

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. चव्हाण ८०८७७९६६११

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** चतुःश्रृंगी पो स्टे ५४३/१७,भादविक ४९८(अ),३०४(ब),३०६,३४

**फिर्यादी** सौ.शिवनंदा शिंदे,वय-४९ वर्षे,रा.थोडगा रोड,ता.अहमदपुर,जि.लातुर

**आरोपी** १.मेघराज किरण भंडारी,वय-२६ २.किशन ऊर्फ राकेश किरण भंडारी,वय-२५ ३.चंद्रकांत प्रभु राचाले,वय-५२ वर्षे व इतर दोन महिला,सर्व रा.पंचवटी,पाषाण,पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** लग्नानंतर दिड वर्षानंतर ते दि.१४/११/२०१७ रोजी ११/३० वा.पर्यंत पंचवटी,पाषाण,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांची मुलगी सौ.आरती मेघराज भंडारी,वय-२५ वर्षे,रा.पंचवटी,पाषाण,पुणे हिचे लग्न तीचा पती मेघराज भंडारी या इसमा बरोबर झाल्यानंतर ती पतीसह सासरी नांदत असताना,यातील नमुद इसम तीचा पती व इतरांनी आपसात संगनमत करून,सौ.आरती हिस माहेराहुन वेळोवेळी पैशाची मागणी करुन मोटार सायकल व सोन्याचे दागिने यांची पुर्तता करुन देखील,परत चारचाकी घेण्यासाठी पैसे आणावे याकारणावरून सौ.आरती हीस शारिरीक व मानसिक त्रास देवुन,दि.१४/११/२०१७ रोजी सकाळी ०९/०० ते ११/३० वा.चे दरम्यान पाषाण येथील राहते घरातील खोलीत असलेल्या सिलींग फॅनला तीच्या ओढणीने गळफास घेऊन सौ.आरती हिस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. सजंय ढेंगे ८४८३०३८९५३

**७**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ४६३/१७,भादविक ३०६,५११,३४

**फिर्यादी** एक महिला,वय-४५,रा.कोंढवा,पुणे

**आरोपी** तीन इसम व एक महिला (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१४/११/१७ रोजी १३/३० वा. कोंढवा,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा ब्युटी पॅझेन्सचा व्यवासय असुन,सदरचा व्यवसाय नीट चालु नये या करिता यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे कामकाजामध्ये अडथळा आणुन धमकावुन,त्यांना विविध प्रकारे त्रास दिल्याने,फिर्यादी यांनी सदर इसमांना जाब विचारला असता त्यांनी फिर्यादीस तु जिवंत असेपर्यंत त्रास देणार,तु कोठे तरी जाऊन जीव दे असे बोलुन,फिर्यादी यांना आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी. कुनगर ९५२७६७११२२

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ६४३/१७,भादविक १४१,१४३,१४७,१४८,१४९,४२७ |
| **फिर्यादी** | गोपीनाथ पवार,वय-५२ वर्षे,रा.जाधव वस्ती,ताथवडे,पुणे |
| **आरोपी** | पाच ते सात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/११/२०१७ रोजी २२/४५ वा.सर्वे नं.४०/२,कृष्णाई पॅालेस,जाधव वस्ती ताथवडे,पुणें येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा महेश पवार व सौरभ पवार या दोघांमध्ये झालेल्या भांडणाचा राग मनात ठेवुन,त्या कारणावरून फिर्यादी हे त्यांचे कुटुंबासह घरी असताना ताथवडे गावा तील यातील नमुद पाच ते सात इसमांनी गैर-कायदयाची मंडळी जमवुन एकत्र येवुन शिवी गाळ करुन,हातात काठया व तलवारी घेवुन मोठ-मोठयाने आरडा-ओरडा करीत दहशत निर्माण करून,फिर्यादी यांचे घरा समोर पार्क केलेल्या गाडयांचे टपावरती व काचेवर मारुन फोडुन गाडयांचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.जी.गोडे ९७६२२२०४२४ |

९

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ६३८/१७,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १७९,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | गुरसेवसिंग गुरूदेवसिंग संधु,वय-३३,रा.तळवडे,पुणे |
| **आरोपी** | कारवरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/११/१७ रोजी १७/०० वा. अश्विनी हॅास्पीटल जवळील व्यंकया मेडीकल समोर बिल्डींग नं.११,कृष्णानगर पोलीस लाईन समोर सार्वजनिक रोडवर चिंचवड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडील गुरूदेवसिंग धर्मसिंग संधु,वय-६२ वर्षे,रा.सदर हे पायी जात असताना,यातील नमुद कारवरील अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार गुरूदेवसिंग धर्मसिंग संधु यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणी भुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. वाय.एस.आव्हाड |

## दि.१५/११/१६७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | दत्तवाडी | भादविक ३५४(अ),३४१ | सचिन किसन निकत | ३५ |
| २ | वानवडी | भादविक ३६३ | अक्षय प्रकाश मंडले | २१ |
| ३ | विमानतळ | भादविक १४३,१४७,३२३,५०६ | सारस विठ्ठल साळवी | ३२ |
| ४ | विमानतळ | भादविक १४३,१४७,३२३,५०६ | गणेश रमेश क्षीरसागर | ३३ |
| ५ | विमानतळ | भादविक १४३,१४७,३२३,५०६ | विजय एकनाथ शिंदे | ४४ |
| ६ | विमानतळ | भादविक १४३,१४७,३२३,५०६ | देवानंद विष्णु धोत्रे | ४२ |
| ७ | कोंढवा | भादविक ३८०,५११,४२७,३४ | आशुआनंद ब्रिजकिशोर सिन्हा | ३३ |
| ८ | वारजे | भादविक ४२०,४०९,३४ | गणेश पोपट कुताळ | २४ |
| ९ | बिबवेवाडी | भादविक ४२० | अमोल सुरेश ढोरे | ३१ |
| १० | हडपसर | भादविक ३५४(ड),५०६ | शुभम उल्हास रोमन | २६ |
| ११ | कोरेगांव | भादविक ४१९,४२०,४६८,४७१,४७४,४७ | फिरोज अहमद अब्दुल रशीद शेख | ३७ |
| १२ | अलंकार | भादविक ३९४,३४ | राकेश लक्ष्मण परदेशी | ३६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**